INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal


PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)

**Multidisciplinary Issue**




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

## PEER REFREED & INDEXED JOURNAL

**January-February-March 2021**

**Vol.-VIII, Issue-I (B)**

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : www.researchjourney.net

***Cover Photo (Source) : Internet- Covid 19-Vaccination (Hon. Prime Minister of India Narendra Modi & Hon. President of U.S.A. Joe Biden)**

**© All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01 | आदिवासी लोकगीतातील स्त्रीवास्तव | प्रा.राजू शनवार | 05 |
| 02 | दशावतार : एक लोककला | डॉ. अंजली मस्करेन्हस | 09 |
| 03 | तडवी समाज आणि संस्कृती | डॉ. धनराज धनगर | 15 |
| 04 | आंध्र प्रदेशातील विठ्ठल भक्तीचे स्वरूप | डॉ.प्रभाकर घोडके | 24 |
| 05 | देवदासी प्रथा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा | डॉ.गजानन भामरे | 29 |
| 06 | तुकारामाची कविता - एक चिंतन | डॉ. निशा जोशी | 32 |
| 07 | रामदासांचे 'मनाचे श्लोक' : एक विश्लेषणात्मक चिंतन | प्रा. अमृता डोर्लीकर | 37 |
| 08 | ओवीगीतातील आई | डॉ. अनिता सोनवणे | 42 |
| 09 | राष्ट्रसंताच्या अभंग गाथेतील विविध देवता | डॉ. प्रवीण कारंजकर | 46 |
| 10 | उपेक्षितांचे जीवनदर्शन घडविणारी श्रेष्ठ कादंबरी 'बळी' | डॉ. रेखा वडिखाये | 51 |
| 11 | अण्णाभाऊ साठेंच्या महाराष्ट्र संसकृतीची यशोगाथा गौरवणाऱ्या पद्यरचना | प्रा. सोमनाथ पावडे | 57 |
| 12 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या जमातींचे लोकजीवन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 61 |
| 13 | साठोत्तरी मराठी कवितेतील महानगरी आशयसूत्रे | डॉ. भरतकुमार भालेराव | 64 |
| 14 | ग्रामीण कादंबरीतील बदलते ग्रामवास्तव | डॉ. वाल्मिक आढावे | 71 |
| 15 | 'अजूनही बरंच काही बाकी' - दिनकर मनवर यांची कविता : एक चिंतन | डॉ. सुरेश वर्धे | 76 |
| 16 | मायबापाच्या जीवनाची व्यक्त झालेली विचार माळ : 'सूर्याची मशाल बाप माझा' | डॉ. प्रमोद गारोडे | 85 |
| 17 | डॉ. दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन : एक दृष्टीकोन | प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. सुरेश जाधव | 91 |
| 18 | 'हरवलेली माणसं' निघालीत माणुसकीच्या शोधात ! | डॉ. मारोती घुगे | 95 |
| 19 | आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीच्या लोकसंस्कृतीचा आविष्कार | प्रा. विनायक राऊत, डॉ. कांचन नलवडे | 102 |
| 20 | युवकांना आत्मबळ देणारा ग्रंथ : कर हर मैदान फतेह | डॉ. भाऊसाहेब गमे | 107 |
| 21 | भगतसिंग यांचे धार्मिक विचार | डॉ. राजेंद्र रासकर | 113 |
| 22 | भुसावळ तालुक्याचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग | डॉ. जगन्नाथ गोपाळ | 118 |
| 23 | १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान रायगड जिल्ह्यातील सरकारी केंद्रावरील हल्ले | डॉ. भानुदास शिंदे | 123 |
| 24 | राजर्षी शाहू महाराज यांची कल्याणकारी राजकीय व्यवस्था | डॉ. देविदास नरवाडे | 126 |
| 25 | आधुनिक संदर्भात महात्मा गांधी यांच्या श्रमविषयक विचारांची उपयुक्तता | डॉ. जी. डी. घोडे | 130 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वाचन अभिरुची व ग्रंथसंपदा | डॉ. प्रशांत पगाडे | 134 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'मूकनायक' आणि 'सामाजिक न्याय' विचार | डॉ. संभाजी पाटील, प्रा. बापूसाहेब जवळेकर | 138 |
| 28 | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची प्रस्तुतता | डॉ.सुनिल पिंपळे | 149 |
| 29 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अस्पृश्य निवारणाचे कार्य : एक चिंतन | प्रा. सुनिलदत्त गोडसे | 153 |
| 30 | महिला सशक्तीकरण धोरणाचा आढावा | डॉ. चांगदेव मुंढे | 156 |

| | | |
|---|---|---|
| 31 | महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभाग : विशेष संदर्भ कर्जत तालुका **डॉ. चंद्रकांत गोंधळी** | 162 |
| 32 | मराठवाड्यातील महिला समुपदेशन केंद्रांची महिला तक्रार निवारणातील भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन **प्रा. श्रीमती इंदू साळुंखे** | 170 |
| 33 | ओतारी समाजातील स्त्रीचे स्थान **प्रा. विक्रम ओतारी** | 175 |
| 34 | लोणारी समाजातील विधवा महिलांच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास **डॉ. संजय शिंदे** | 178 |
| 35 | कोरोना काळात मोलकरणींच्या कुटुंबियांवर झालेल्या परिणामांचे अध्ययन **डॉ. नारायण गाढे** | 189 |
| 36 | शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य- एक दृष्टिक्षेप **डॉ. अनिल वाघ** | 193 |
| 37 | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा चिकित्सक अभ्यास **प्रीती दीक्षित, प्रा. ए. आर. मुंगी, प्रा. ए. वाय. दीक्षित** | 199 |
| 38 | भारतातील राजकीय गुन्हेगारीकरण : एक अभ्यास **प्रा. ए. पी. वनारसे** | 206 |
| 39 | गायत्री शक्तीपिठाच्या नवरात्री उत्सवातील मंत्रसाधना- वैज्ञानिक दृष्टी **डॉ. रजनी लुंगसे** | 210 |
| 40 | बँकांचे विलीनीकरण धोरणाचा चिकित्सक आभ्यास **डॉ. नीता वाणी** | 215 |
| 41 | स्वामीनाथन आयोगाचे अवलोकन **डॉ. एस. पी. देवरे** | 220 |
| 42 | केंद्रीय कृषी योजना : सिंहावलोकन **डॉ. एम. व्ही. हिरे** | 224 |
| 43 | प्रधानमंत्री मुद्रा योजना - अवलोकन **डॉ. आर. के. जाधव** | 228 |
| 44 | मुलभूत सुविधा आणि कृषी विकास **डॉ. बी. एम. सोनवणे** | 232 |
| 45 | ग्रामीण विकासात लोकांच्या सहभागाची आव्हाने **डॉ. मारुती केकाणे** | 236 |
| 46 | टाळेबंदी (लॉक डाऊन) नंतरची ग्रामीण अर्थव्यवस्था - विशेष अभ्यास **डॉ.सुरेश ढाके** | 244 |
| 47 | भारतीय नवीन कृषी धोरण २०२० : एक दृष्टिक्षेप **डॉ. गोरखनाथ वाकळे** | 249 |
| 48 | नवीन कृषी धोरण (कायदे) २०२० : संधी आणि समस्या **प्रा. देवानंद मंडवधरे** | 254 |
| 49 | राष्ट्रीय कृषी धोरण २०२० : एक विषलेशणात्मक अभ्यास **डॉ. रामदास मुक्टे** | 259 |
| 50 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्यांच्या दर्जाचा अभ्यास **श्रीनिवास पाटील** | 265 |
| 51 | व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे महत्त्व **डॉ. मनिष देवरे** | 272 |
| 52 | विना साहित्य व्यायामाचा कुमार गटातील विद्यार्थ्यांच्या स्नायूंची ताकद व दमदारपणावर होणारा परिणाम **विशाल गायकवाड, आदित्य कुलकर्णी** | 276 |
| 53 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील हँडबॉल खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्य यातील सहसंबंधाचा अभ्यास **श्रीनिवास पाटील** | 279 |
| 54 | भगतसिंग यांचे युवकांच्या संबंधीचे विचार **डॉ. राजेंद्र रासकर** | 285 |
| 55 | आधुनिक ज्ञानयुगाचा सारथी : शिक्षक **श्री.विपीन वैराट** | 289 |
| 56 | उच्च शिक्षणात माहिती व तंत्रज्ञानाचे महत्त्व **डॉ. अनमोल शेंडे** | 295 |
| 57 | विधीसंघर्षग्रस्त मुलांची प्रवृत्ती **डॉ. अशोक सातपुते** | 300 |
| 58 | राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि आप्तवाक्य : एक तात्त्विक विश्लेषण **डॉ.राजेसाहेब मारडकर** | 304 |
| 59 | गावडी बोलीचो व्याकरणीक आनी भासविज्ञानीक नदरेंतल्यान अभ्यास **दिपराज सातोर्डेकर** | 311 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन : एक दृष्टीकोन

**संशोधक**
**प्रा. विठ्ठल संपत जाधव**
के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक

**मार्गदर्शक**
**डॉ. सुरेश विनायक जाधव**
के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक

*'ललित' ही संज्ञा भाषेच्या व्यापारासंदर्भात आहे. ज्या भाषेत रमणीयता, मोहकता आकर्षकता आणि वाचकांना खिळवून ठेवण्याची क्षमता असते, ती भाषा 'ललित' असते आणि त्या भाषेत लिहिलेले साहित्य हे 'ललित साहित्य' असते. ललित साहित्याचे वेगळेवेगळे प्रकार पडतात. उदा. कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र-आत्मचरित्र, ललित गद्य इ. पैकी ललित गद्य या प्रकारात स्तंभलेखनाचा अंतर्भाव असतो. कारण ललित गद्य हा संमिश्र लेखन प्रकार आहे. त्यात निबंध, लघु निबंध, आठवणी, अनुभव, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रे, लेख, विनोदी लेख, स्तंभलेखन इ. चा समावेश असतो. यासर्व लेखनप्रकारांचा विचार केला तर लघुनिबंध ते ललित गद्य असा एक मोठा आणि व्यापक स्वरूपाचा अवकाश दिसतो. ललित गद्य हे प्रसरणशील, लवचिक, वैविध्यपूर्ण, आणि सर्वसमावेशक आहे. ललित गद्याप्रमाणेच स्तंभलेखनाचेही वेगवेगळे प्रकार असून ललितस्तंभलेखन हा त्यातला एक महत्त्वाचा प्रकार आहे.*

ललित स्तंभलेखन हे त्या लेखकाचे व्यक्तिमत्व कितपत समृद्ध आहे ? भोवतालच्या व्यवहाराकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन नेमका कसा आहे? जीवनाच्या विविध अंगांबद्दल त्या लेखकाला कितपत ज्ञान आहे?याशिवाय जीवनाची गुंतागुंत समजून घेण्याची कुवत कितपत आहे ? त्यावर त्याच्या ललितस्तंभलेखनाची कलात्मकता अवलंबून असते. कलात्मकता हेच ललित स्तंभलेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. एखादा विचार, एखादी घटना, एखादा प्रसंग अथवा एखादी मनःस्थिती जेंव्हा 'भावरूप' धारण करते, तेंव्हाच त्या ठिकाणी लालित्य अवतरू शकते. लेखकाचा आत्माविष्कार तेथे स्वैर आणि स्वच्छंद असतो. पण तेथील सर्व घटक अंतिमतः लेखकाला अभिप्रेत असणाऱ्या भावानुभूतीच्या सूत्रानेच एकत्र बांधलेले असतात. मनोवास्थांच्या अशा रूपांची व्याप्ती फार मोठी असते. स्तंभलेखातील लालित्य हे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रगल्भतेनुसार, समृद्धतेनुसार, चिंतनशिलतेनुसार, संस्कारानुसार आणि संवेदनशिलतेनुसार विविध रूपांमध्ये आकारत असते. या दृष्टीने दिलीप धोंडगे यांच्या एकूण स्तंभ लेखनात प्रचंड वैविध्य आढळून येते. त्यांचे स्तंभलेखन हे वेगवेगळ्या विषयावर आधारलेले असले तरी बहुतांशी स्तंभलेखनात लालित्य उतरलेले दिसते. त्यामुळे ललित स्तंभलेखनाचे देखील आशय आणि विषयानुसार वेगवेगळे प्रकार करावे लागतील. 'हरवले गाव' व 'सांगनं नही पण सांगनं वनं' या दोन ग्रंथांमध्ये संकलित केलेले स्तंभलेख हे ललित या सदरात मोडणारे आहेत. याशिवाय 'तात्पर्य' या चिंतनात्मक ग्रंथामध्ये व 'तुका म्हणे भाग -१ व भाग -२' या अभंगनिरुपणात्मक ग्रंथांमध्येहीबऱ्याच ठिकाणी लालित्य जाणवते. मात्र त्यांच्या स्तंभलेखनाचे ललित आणि ललितेतर असे दोन विभाग केलेले असल्यामुळे त्यांच्या ललित स्तंभलेखनाच्या अभ्यासाची प्रमुख साधने म्हणून 'हरवले गाव' आणि 'सांगनं नही पन सांगनं वनं' या दोन ग्रंथांकडेच पहावे लागते.

डॉ. दिलीप धोंडगे हे संत साहित्याचे अभ्यासक म्हणून जसे प्रसिद्ध आहेत, तसेच ते स्तंभलेखक म्हणूनही परिचित आहेत. त्यांनी प्रदीर्घ काळ वेगवेगळया वृत्तपत्रांमधून वैचारिक, तत्त्वचिंतनात्मक, ग्रंथपरीक्षणात्मक, विश्लेषणात्मक, अध्यात्मिक आणि ललित स्तंभलेखन केलेले आढळते. त्यांच्या स्तंभलेखनाचे विविध पैलू आहेत. सामाजिक-सांस्कृतिक-साहित्यिक-अध्यात्मिक-तात्त्विक-समीक्षणात्मक अशा वेगवेगळया

विषयांवर त्यांनी स्तंभलेखन केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक व्यापक अवकाश लाभलेला आहे. केवळ कुठल्याही एका साच्यात न बसणारे त्यांचे स्तंभलेखन बहुपदरी आयाम घेऊन अवतरलेले आहेत. मात्र त्यांचे वैचारिक स्तंभ वगळता बहुतांशी स्तंभलेख हे लालित्याचे अंगाने जाणारे आहेत.त्यांचे ललितस्तंभलेखन हे त्यांच्या चतुरस्त्र प्रतिभेचे साक्षीदार आहेत.

लेखक दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन हे प्रामुख्याने चिंतनिकेच्या, आठवणींच्याआणि व्यक्तीचित्रणांच्या स्वरुपात झालेले दिसते. त्यांना सार्वजनिक व कौटुंबिक जीवनात भेटलेल्या विविध तऱ्हेच्या, स्वभावाच्या व्यक्ती, समाजात घडलेल्या सामाजिक-सांस्कृतिक-राजकीयघडामोडी, त्यांनी अनुभवलेले लौकिक जगाचे विविधांगी रूपे हे त्यांच्या ललितस्तंभलेखनाचे प्रमुख आधार आहेत. ग्रामीण लोकजीवन, लोकसंस्कृती आणि तिथला निसर्ग हे त्यांच्या आस्थेचे आणि प्रेमाचे विषय आहेत. त्यामुळेच त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी हे विषय आलेले दिसून येतात. लेखकाचे लहानपण ज्या खान्देशात गेलेले आहे आणि लेखक म्हणून जडणघडण ज्या खान्देशी सांस्कृतिक पर्यावरणात झालेली आहे, तिथल्या अनेक सण उत्सवांचे वर्णन त्यांच्या ललितस्तंभलेखनात आढळतात. दिवाळी, दसरा, पोळा, नागपंचमी, गणपती, गुलाबाई, नवरात्र या सणांचे ग्रामीण परिवेशातील भूतकालीन रूपे आणि त्यातून आविष्कृत होणाऱ्या लोकसंस्कृतीचे दर्शन त्यांच्या ललितस्तंभलेखनात आढळून येते.

"दसरा रे भाऊ
तू नही ना एकोरा
बहिणी नवराती
तुले देतीस आसरा."१

अहिराणी भाषेत दसऱ्याच्या सणानिमित्त म्हटले जाणारे उपरोक्त लोकगीत आणि त्यानिमित्ताने केले जाणारे विधी अत्यंत तरल भाषेत लेखकांनी नोंदवून ठेवले आहे.

आपले जीवन सुरुळीतपणे सुरु राहावे, त्यात काही विघ्ने येऊ नयेत, दोषांचे निरसन व्हावे यासाठी ग्रामीण भागातवेगवेगळे विधी केले जातात त्याला 'लोकविधी' असे म्हटले जाते. खान्देशात प्रचलित असणाऱ्या अशा वेगवेगळ्या लोकविधींचा आढावा लेखकांनी घेतलेला आहे. उदा. जावळ काढण्याचा विधी, छोट्या कानबाईचा पूजाविधी, मोठ्या कानबाईचा पूजाविधी, कवाडकाठीचा विधी इ. या विधींची प्रादेशिक वैशिष्ट्ये लेखकाने नोंदवलेली आहेत. या प्रसंगी म्हटली जाणारी विधीगीते लेखकांनी नोंदवून ठेवली आहेत. उदा. 'कानबाईखालचा लग्नविधी' या लेखात पुढील विधीगीताची नोंद सापडते.

"सोनार उठंस उठंस लवलाही
पुतळ्या घडंस घडंस घाई घाई
सुतार उठंसउठंस लवलाही
चौरंग घडंसघडंस घाई घाई
सिपा उठंसउठंस लवलाही
काचोळी शिवंस शिवंस घाई घाई."२

त्याचप्रमाणे ग्रामीण समाजात निसर्ग आणि जीवनचक्राच्या संदर्भात पिढ्यानपिढ्या ज्या काही समजुती निर्माण झालेल्या असतात, त्यातून काही लोकभ्रम तयार झालेले असतात. खान्देशात प्रचलित असणाऱ्या अशा काही लोकभ्रमाचा आढावा लेखकाने वेगवेगळ्या ललित स्तंभलेखांतून घेतलेला आहे.

लोकजीवनाचा अविष्कार म्हणजे तिथे प्रचलित असणाऱ्या लोककला असतात. ग्रामीण भागात लोकमनोरंजनाचे व लोकज्ञानाचे माध्यम म्हणून लोककलेकडे पाहिले जाते. खान्देशात प्रचलित असणाऱ्या अशा अनेक लोककलाप्रकारांची ओळख धोंडगेंच्या ललितस्तंभलेखनातून होते. तमाशा, लळीते, बोहाडा, किर्तनं,

जागरणं यांसोबतच भटक्या लोककलावंतांच्या कसरतीच्या कलांचाही वेध लेखकाने घेतलेला आहे. याशिवाय त्यांच्या ललित स्तंभलेखनात लोकगीताचे दालन फार समृद्ध आहे.त्यांच्या लेखनात खान्देशातील आणि विशेषतः अहिराणी भाषेतील लोकगीतांच्या नोंदी मोठ्या प्रमाणात आढळतात. वेगवेगळया सण-उत्सव-विधी प्रसंगी म्हटली जाणारी लोकगीते लेखकांनी त्यांच्या अर्थासहित दिलेली आहेत. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या गीतांचा उल्लेखही बऱ्याच ठिकाणी आढळतो. स्त्रीगीतांचे आणि त्यांच्या भावविश्वाचे सुंदर विश्लेषण लेखकाने केलेले आहे. या लोकगीतांमधून त्यांनी खान्देशातील लोकजीवनाचे विविधांगी दर्शन घडवले आहे. खान्देशातील रूढी, परंपरा, लोकमनाचे अंतरंग, त्यांच्या जगण्याच्या तऱ्हा आणि स्वाभाविकता या लोकगीतातून आविष्कृत झालेल्या दिसून येतात. त्याचप्रमाणे लेखकाने म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, कोडी अशा विविध लोकाविष्कारातून अहिराणी भाषेच्या सौदार्यांची एक संपन्न अशी अनुभूती दिलेली आहे. भाषिक सौंदर्याबरोबरच भाषिक क्रीडन करण्याची सर्जकता, लोकतत्त्वाचा आविष्कार, तिथल्या लोकप्रतिभेचा उन्मेष, नात्यांमधले मर्मबंध आणि स्वभाव वैशिष्ट्यांची विविधताही दर्शविलेली आहे.

डॉ. दिलीप धोंडगे यांच्या ललितस्तंभलेखनाचा गाभाच ग्रामसंस्कृती आणि ग्रामीण लोकजीवन असल्यामुळे त्यांच्या लेखनात ग्रामव्यवस्थेचे विविधांगी रूपे पाहायला मिळतात. त्यात रम्यतेच्या खुणा अधिक आहेत.मात्र गावगाड्याबद्दलच्या प्रेमासोबतच त्यातील शोषणमूलक विषम व्यवस्थेबद्दल चीडही दिसते. गावगाड्यात जे मंगल आहे त्याचा त्यांनी हार्दिकतेने उद्घोष केला आहे आणि जे अमंगल आहे त्याचा निषेधही नोंदवलेला आहे. या संदर्भात अशोक चौसाळकर म्हणातात, “ प्रा. धोंडगे यांनी खानदेशाची ही रूप सुंदर लोकसंस्कृती व लोकजीवन त्याच्या सर्व रस, रंग, रूप यांसह आपल्या शब्दसामर्थ्याने आपल्या समोर उभी केली आहे.”[३] त्याचबरोबर ग्रामव्यवस्थेतील चिन्हसृष्टीची आणि त्यातून आकाराला आलेल्या प्रतीकांची मांडणी केलेली आहे. गावाचा भूगोल, समाज, संस्था आणि संस्कृती या घटकांना सिद्ध करणारी एक व्यापक चिन्हसृष्टी आहे. ही चिन्हसृष्टी ज्या प्रतिमा आणि प्रतीकांच्या रुपात साहित्यातून अवतरते त्यांचा शोध आपल्या स्तंभलेखनातून लेखकांनी घेतलेला आहे.

लेखक दिलीप धोंडगे यांच्या ललित स्तंभलेखनातून निसर्गाला वेगळे काढता येत नाही.गाव आणि निसर्ग यांचा फार जवळचा संबंध आहे. हा गावाशी आणि गावातल्या निसर्गाशी एकरूप झालेला लेखक आहे. त्यांच्या स्तंभलेखनातून प्रकटलेला निसर्ग हा आठवणींच्या स्वरूपातला आहे. लेखकाचे बालपण खान्देशातील निसर्गाने नटलेल्या प्रदेशात गेले. तिथे निसर्गाची समृध्द अशी नानाविधी रूपं त्यांनी बालपणी पाहिली व अनुभवली, तीच त्यांच्या लेखनातून अतिशय तरलपणे अवतरली आहेत. पाऊस आणि पाण्याचे सर्वाधिक संदर्भ त्यांच्या लेखनात आढळतात. निसर्गतत्त्वाच्या मुळाशी पाणी असल्याने पाण्याच्या मुबलकते शिवाय निसर्ग आपले सौदर्य प्रदर्शित करू शकत नाही. त्यामुळे एकूणच निसर्गाच्या आणि त्या अनुषंगाने गावाच्या सर्वांगाने झालेल्या पडझडीच्या मुळाशी पाण्याचे दुर्भिक्ष हेच एकमेव कारण असल्याचे त्यांच्या लेखनातून वारंवार जाणवत राहते.

लेखक दिलीप धोंडगे यांनी आपल्या स्तंभलेखनातून खान्देशी माणसाच्या स्वभावाचे विविध पैलू सांगितलेले आहेत. विशेषतः ‘सांगनं नही पन सांगनं वनं’ या ग्रंथामध्ये खान्देशी माणसांची व्यक्तिचित्रणे आलेली आहे. हा संपूर्ण ग्रंथच व्यक्तिचित्रणात्मक आहे. त्यामुळे त्यातील बहुतांशी लेख हे वेगवेगळया व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांवर आधारलेली आहेत. मात्र लेखकाच्या आत्मकथनातून ही व्यक्तिचित्रे साकार झाल्याने लेखकाची त्या व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टी त्यातून दृगोचर होते. ही व्यक्तिचित्रणे त्यांच्याच म्हणजे अहिराणी बोलीत साकारल्याने ती अधिक लज्जतदार झालेली आहेत. व्यंकटेश माडगुळकरांनी जसे ‘माणदेशी माणसे’ मराठी साहित्यात अजरामर केली तसेच दिलीप धोंडगे यांनी ‘खानदेशी माणसे’ आपल्या ललित स्तंभलेखनातून अजरामर केलेली आहेत. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. एकनाथ पगार म्हणतात, “येथे अधून मधून ‘माणदेशी

माणसे' 'मालगुडी डेज' यांच्या स्मरणाला उजाळा मिळतो. माणदेशी माणसांपेक्षा ही बागलाणी माणसे आणखीनच उमटून पडतात."४ खान्देशी प्रदेश आणि तिथल्या व्यक्तिरेखा यांचा सहज सुंदर अविष्कार त्यांच्या ललितस्तंभलेखनात पाहायला मिळतो. त्याचप्रमाणे मानवी स्वभावातील वैचित्र्य, व्यंगे, नितळताही त्यांनी दर्शविलेली आहे. मात्र लेखक दिलीप धोंडगे यांच्या बहुतांशी ललित स्तंभलेखांच्या शेवटी काहीतरी हरवलेपणाची खंत आढळून येते. ते मनोगतात म्हणतात, " यामुळेच माझे 'हरवले गाव' मी गावाच्या आसमंतात, गावपण आणि संस्कृती संगठीत करणाऱ्या घटकांमध्येच शोधले. आज पंचवीस वर्षांनंतर गाव संपूर्णपणे हरवले आहे. या लेखनात ते निश्चित सापडेल अशी खात्री वाटल्यामुळे प्रस्तुत लेखन आपल्या हाती सुपूर्द करत आहे."५ हरवल्या गावाच्या अनेक खुणा या ललित स्तंभलेखात सापडतात.

एकूणच डॉ. दिलीप धोंडगे यांच्या ललित स्तंभलेखनाचा समग्र अवकाश ग्रामीण जीवनाने व्यापलेला आहे. त्यामुळेच गावाचे गावपण हरवत चालल्याची खंत त्यांच्या लेखनात जागोजागी उमटताना दिसते. त्यांनी आपल्या ललित स्तंभलेखनातून वर्णन केलेल्या गावाचे किंवा गावातील लोकसंस्कृतीचे आता पुनरुज्जीवन होणार नाही. कारण तिचा आर्थिक व सामाजिक पाया नष्ट झाला आहे, याचे भान लेखकालाआहे, परंतु या समृद्ध ठेव्याची, त्यातल्या सर्जनक्षमतेची पुढच्या पिढ्यांना किमान आठवण तरी राहावी ही कळकळ त्यांच्या लेखनातून जाणवते. काहीतरी हरवल्याची जी एक हुरहूर त्यांच्या लेखनातून सतत जाणवते त्यामागे गतकाळाला कुरवाळण्याची वृत्ती नसून मानवी सर्जनाला कुरवाळण्याची वृत्ती असल्याचे जाणवते.

**संदर्भ सूची**

१. धोंडगे दिलीप, हरवले गाव, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. २०१६, पृ. १२६
२. तत्रैव, पृ. ९३
३. चौसाळकर अशोक, दिलीप धोंडगेकृत 'हरवले गाव' या ग्रंथाच्या प्रस्तावनेतून पृ.१६
४. पगार एकनाथ, दिलीप धोंडगेकृत 'सांगनं नही पन सांगनं वनं' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.२०१५या ग्रंथाची प्रस्तावना पृ. १६
५. धोंडगे दिलीप, 'सांगनं नही पन सांगनं वनं'उनि, मनोगत, पृ.१०